प्रेसनोट

दिनांक ०७/०७/२०२५

अँन्टी करप्शन विभाग, नवी मुंबई कार्यालयाकडुन लाच मागणी प्रकरणी कारवाई

| | | | |
|---|---|---|---|
| १. | विभाग/घटक | :- | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| २. | पोलीस स्टेशन गुन्हा रजि. क. व कलम | :- | श्रीवर्धण पोलीस ठाणे, जि.रायगड, ४४/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) कलम ७ |
| ३ | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | :- | दिनांक ०७/०७/२०२५ रोजी १२.४१ वाजता |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | | लोकसेवक विकास मधुकर बोंडले, महसुल सहायक, तहसीलदार कार्यालय श्रीवर्धन वय ३५ वर्ष, (वर्ग ३) रा. पतंगे सीटी रूम नं ३०१ अे विंग, श्रीवर्धन बसडेपोच्या समोर, ता. श्रीवर्धन, जि. रायगड |
| ५ | लाचेची मागणी रक्कम | :- | रु. १५,०००/- |
| ६ | स्विकारलेली रक्कम | :- | --- |
| ७ | थोडक्यात हकीगत | :- | यातील तक्रारदार यांनी दि. २४/०६/२०२५ रोजी लाप्रवि, नवी मुंबई कार्यालय येथे येवून तक्रार दिली की, , तक्रारदार तसचे १) डॉ. रमेश हुकमीचंद अगरवाल, २) श्रीमती नेत्रा मोहन साळवी अशा तिघांनीं मिळुन शेतकरी श्री चंद्रमणी रामदास मोरे, राह. कारलास, ता. श्रीवर्धन, जि. रायगड यांची सर्वे नं. २६० एरिया हे. आर.पी. १-३९-०० ही शेतजमीन खेरेदी केली असुन, सदर जमीनीच्या सातबाऱ्यामध्ये त्यांची नावे नोंद होणेकरीता केलेल्या अर्जावर तलांठी सजा दिघी चे तलाठी श्री आदित्य धनावडे यांनी तहसीलदार श्रीवर्धन यांचेकडुन तक्रारदार हे शेतकरी आहेत अगर कसे? याबाबत पडताळणी करणेकरीता पत्रव्यवहार केला होता. सदर प्रकरणी आरोपी लोकसेवक श्री विकास बोंडले लिपीक तहसीलदार कार्यालय श्रीवर्धन यांनी तक्रारदार यांच्याकडे शेतकरी असल्याबाबतची पडताळणी करून सातबाऱ्यावर तक्रारदार यांचे नाव नोंद होणेकरीता तलाठी सजा दिघी यांचे कार्यालयामध्ये पाठवीण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे रू. १५,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचें दिनांक २६/०७/२०२५ रोजी पंच साक्षीदारांसमक्ष केलेल्या पडताळणीमध्ये निष्पन्न झाले होते.<br>त्याप्रमाणे दिनांक ३०/०६/२०२५ रोजी आयोजीत सापळा कारवाई दरम्यान आलोसे विकास बोंडले, महसुल सहायक, तहसीलदार कार्यालय, श्रीवर्धण, जि. रायगड यांना तक्रारदार यांचा संशय आल्याने त्यांनी तक्रारदार यांना तुमचे काम पुढे पाठवीले आहे असे सांगुन रक्कम स्विकारण्यास नकार दिला. लोकसेवक लिपीक श्री. विकास बोंडले यानी दिनांक २६/०६/२०२५ रोजीच्या पडताळणी दरम्यान तक्रारदार यांच्या सातबारा नोंदीच्या प्रलंबीत कामाच्या अनुषंगाने रू. १५,०००/- लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न होत असल्याने सदर प्रकरणी मा. पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परीक्षेत्र ठाणे यांचे परवानगीने तक्रारदार यांचा फिर्यादी जबाब नोंद करून त्याप्रमाणे श्रीवर्धन पोलीस स्टेशन जि. रायगड येथे गुन्हा रजि. क. |

पोलीस उप-अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ४४/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे आज दिनांक ०७/०७/२०२५ रोजी १२:४१ वाजता गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंध विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंध कार्यालय,ठाणे परिक्षेत्र,ठाणे यांचेशी संपर्क करावा.

मार्गदर्शन अधिकारी:-मा.श्री. शिवराज पाटील,पोलीस अधीक्षक ,ॲन्टी करप्शन ब्युरो,ठाणे परिक्षेत्र,ठाणे
मा. श्री. संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे
मा.श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

संपर्क पत्ता :-ला.प्र.वि. नवी मुंबई मध्यवर्ती सुविधा इमारत फळमार्केट, तुर्भे, से.न.१९, एपीएमसी
नवी मुंबई, ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१
संकेत स्थळ :–acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– spacbthane@mahapolice.gov.in,
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :–acbmaharashtra.net
टोलफ्रीनं. :–१०६४ दुरध्वनी क्र. :–०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
असीबी, नवी मुंबई कार्यालय दुरध्वनी क. –२७८३३३४४/८३५६८२६४०३

पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई

(धर्मराज सोनके)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई